# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर

## P.R.O. OFFICE, DCP ZONE-4, THANE CITY

Address- Office of Dy. Commissioner of Police, Zone-4,
Near Central Police Station , Behind Central Hospital, Ulhasnagar- 3
Email Id- cp.thane.pro@mahapolice.gov.in Contact No: +919819028279


THANE POLICE COMMISSIONERATE

प्रेसनोट क्रमांक दिनांक– ०४/०८/२०२२

**<u>फसवणुकीच्या गुन्हयातील आरोपीत यास अटक केलेबाबत</u>**

शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दित दिनांक ०५/०४/२०२२ रोजी दुपारी १२:३० वा. चे सुमारा स्वामी समर्थ चौक येथील शॅम्बीज कॅफे हॉटेल,अंबरनाथ पुर्व येथे यातील आरोपी मुन्ना व त्याचे दोन अनोळखी साथीदार यांनी संगणमत करून फिर्यादी अजमतुल्ला अस्मातुलाह चौधरी, वय ४१ वर्ष, रा. सीउसटी रोड, महबुब चाळ, नुरी मस्जीद कलीना डोंगर, रूम नं. १०६ सांताक्रुज पुर्व, मुंबई यांना रक्कम रूपये ५,००,०००/– सुट्टे करून देण्याचे बदल्यात रूपये ५,५०,०००/–अशी जास्त रक्कम देण्याचे अमीष दाखवुन फिर्यादी यांचेकडुन रूपये ५,००,०००/–रक्कम घेवुन त्यास कोणतेही पैसे परत न देता फसवणुक करून पळुन गेल्याने शिवाजीनगर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर ११६/२०२२ भा.द.वि.कलम ४२०,३४ प्रमाणे दिनांक १४/०४/२०२२ रोजी २०:२३ वाजता दाखल आहे.

नमुद गुन्हयाचे तपासात घटनास्थळी असलेल्या सी.सीटी.व्ही फुटेजच्या आधारे आरोपीत यांचा शोध घेत असतांना दिनांक ०२/०८/२०२२ रोजी गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने शहाड रेल्वे स्टेशन जवळील सपना हॉटेल जवळ सापळा रचुन आरोपीत सुनिल नगीना साव, वय ५६ वर्ष,रा. मिलींदनगर, घर नं. ७, रूम नं. ७, कल्याण प. मुळगाव–गाव शेखपुरा, ता.दाउनगर, पोलीस ठाणे गोह,जि.औरंगाबाद, बिहार यास ताब्यात घेवुन पोलीस ठाण्यात आणुन त्याचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने कसुन तपास केला असता, त्याने गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यास दिनंक ०२/०८/२०२२ रोजी २०:५५ वा. अटक करून दिनांक ०३/०८/२०२२ रोजी मा. न्यायालयात हजर केले असता, मा.न्यायालयाने त्याची दिनांक ०६/०८/२०२२ रोजी पावेता पोलीस कस्टडी मंजुर केली असुन नमुद गुन्हयाचा तपास सपोनि.ए.ए.शाह हे करीत आहे

वर नमुद कारवाई मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–४, उल्हासनगर, मा.सहा. पोलीस आयुक्त, अंबरनाथ विभाग, अंबरनाथ यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि मधुकर भोगे, सपोनि.ए.ए.शाह,पोना/९६३ पंडीत, पोना/६३४५ वळवी, पोशि/७२३२ ठाकुर यांनी पार पाडून उल्लेखनीय कामगिरी केली आहे.